# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक
दिनांक १६/०९/२०१७

दिनांक १५/०९/२०१७ रोजी मिळालेल्या गुप्त बातमिदाराच्या खबरेवरुन मा. पोलीस अधिक्षक सो. व मा. अपर पोलीस अधिक्षक सो. यांच्या आदेशान्वये तसेच मा. प्रभारी अधिकारी स्थागुशा गडचिरोली यांचे मार्गदर्शनाखाली मौजा आलापल्ली ता. अहेरी, जि. गडचिरोली येथील आरोपी नामे १) संतोष प्रदिप आत्राम, वय-२८ वर्ष रा. आलापल्ली यांचे राहते घरी विदेशी दारु विक्री कामी साठवणुक करुन ठेवलेली आहे अशा खात्रीशिर खबरेवरुन मिळालेल्या माहितीच्या आधारे सापळा रचून आरोपीचे राहते घराची अवैध दारु संदर्भात झडती घेतली असता त्यांचे राहते घरातील स्वयंपाक खोलीमध्ये ४७,४५०/- रु. चा. माल अवैधरित्या विक्री करीता साठवणुक करुन ठेवला होता. सदरचा विदेशी दारुचा माल आरोपी १) संतोष प्रदिप आत्राम वय-२८ वर्ष याच्या मालकीचा असून नामे २) अमित बघेले रा. आलापल्ली यांनी सदर अवैध दारुचा पुरवठा केल्याचे आरोपी क्र.१ यांनी सांगितल्याने नमुद दोन्ही आरोपीविरुध्द पोस्टे अहेरी येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५ (ई), ८३ अन्वये गुन्हा नोंद केला असून गुन्हयाचा तपास पोस्टे अहेरी येथे चालू आहे.

सदरची कारवाई, सफौ/८४० किशोर इंगोले, सफौ/७८७ करकाडे, पोहवा/२००० ओमप्रकाश उंदिरवाडे, पोहवा/२१४३ प्रेमकुमार दुर्गे, पोहवा/८४५ प्रमोद वाळके, मपोशि/५०८ वैशाली चव्हाण, चापोशि/५२९२ प्रदिप चवरे स्थानिक गुन्हे शाखा, गडचिरोली यांनी पार पार पाडली आहे.



# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक
दिनांक १६/०९/२०१७

दिनांक १४/०९/२०१७ रोजी मिळालेल्या गुप्त बातमिदाराच्या खबरेवरुन मा. पोलीस निरीक्षक सा. स्थानिक गुन्हे शाखा, गडचिरोली यांचे आदेशान्वये मौजा-देऊळगांव जवळ नागपूर ते गडचिरोली येणाऱ्या सावकार ट्रॉव्हलची प्रोव्ही संबंधात तपासणी केली असता नामे १) धनंजय राजेश लारोकर रा. भांडेवाडी नागपूर, २) किवीस ऊर्फ रोहण अनिल सोनी रा. नैनपुर तालाब टोली ता.जि. मंडला यांचे ताब्यात एकुण ५२८००/- रुपयाचा विदेशी दारु माल मिळून आल्याने त्याचे विरुध्द पोस्टे आरमोरी येथे कलम ६५ (अ), (ई), ८३ महा. दारुबंदी कायदयान्वये गुन्हा नोंद केला पुढिल तपास आरमोरी येथे चालु आहे.

सदरची कारवाई सफौ/किशोर इंगोले, पोहवा/नरेश सहारे, पोना/उध्दव नरोटे, पोना/दुधराम चवारे, मपोशि/दुर्गा साखरे, चापोशि/प्रशांत पातकमवार यांनी केली आहे.